# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

*(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)*

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपील**

**क्र.रामाआ/नाशिक/द्वितीय अपील क्रमांक — ५०८/२०२२/जळगांव**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. तुळशीदास मुरारी कवाळे<br>रा. द्रौपदी निवास, प्रतिभा निकेतन शाळेसमोर, कैलास नगर, नांदेड, ता.जि. नांदेड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा,<br>उप विभागीय अभियंता,<br>जिल्हा परिषद, ग्रामीण पाणी पुरवठा उप विभाग,<br>अमळनेर, ता. अमळनेर, जि. जळगांव. | : | प्रतिवादी |
| २ | प्रथम अपिलीय अधिकारी तथा,<br>कार्यकारी अभियंता,<br>ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परीषद,<br>जळगांव, ता.जि. जळगांव. | : | प्रतिवादी |

**सुनावणी दिनांक — ०८/१२/२०२२**

अपिलार्थी यांनी दि. ०४/०१/२०२२ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिल दाखल केले असून त्यामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी माहिती शुल्क ३१६/- आकारले असुन प्रत्यक्ष माहिती पुरविण्यास १९४/- रुपये लागले असुन जन माहिती अधिकारी यांनी उर्वरीत रक्कम रुपये १२२/- परत केले नाही. तसेच ३१ महीन्याचे पगार पत्रके दिलेली नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला नाही, असे कारण नमूद केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी दि.०८/१२/२०२२ रोजी आयोजित करण्यात आली होती.

**सुनावणीसाठी उपस्थित-** विद्यमान जन माहिती अधिकारी, तत्कालीन व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी

**सुनावणीसाठी अनुपस्थित-** अपिलार्थी, तत्कालीन जन माहिती अधिकारी (मयत)

अपिलार्थी यांनी दि. १०/०९/२०२१ रोजीच्या माहिती अर्जान्वये दिनांक ०१/०८/१९९३ ते दिनांक १९/०६/२००० या कालावधीतील कनिष्ठ अभियंता म्हणुन आपल्या उपविभागात असथापणावर कार्यरत होते. तरी वरील कालावधीचा फक्त माझ्या पगार पत्रकाच्या प्रतीची एका पानाच्या साक्षांकित प्रती देण्यास विनंती किंवा सदर कागदपत्रे नष्ठ झाली असतील तर ती नष्ठ केल्याचे रेकॉड ज्या रजिष्टर मध्ये आहे त्याची प्रत याबाबतची माहिती मिळण्याची विनंती केली होती. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीना दिनांक ०४/१०/२०२१ रोजीच्या पत्रान्वये मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध असुन त्या माहितीच्या प्रतीची संख्या ८३ इतकी आहे. सदर माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी माहितीचे शुल्क रुपये ३१६/- लेखाशिर्षा खाली भरण्यात आल्यानंतर माहिती पुरविण्यात येईल

असे कळविले होते. त्यानंतर अपिलार्थी यांनी सदर माहिती शुल्क भरले असल्याने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २९/१०/२०२१ रोजीच्या पत्रान्वये माहितीचे १ ते ५२ पृष्ठांची माहिती पुरविण्यात येत असल्याचे कळविले होते.

तद्नंतर अपिलार्थी यांनी दि. २९/११/२०२१ च्या अर्जान्वये प्रथम अपिल दाखल केले. सदर प्रथम अपिल विभागास दिनांक १७/१२/२०२१ रोजी प्राप्त झाले होते. सदर प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी सुनावणी घेऊन दि. १४/०१/२०२२ रोजी, निर्णय पारित करुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २९/१०/२०२१ रोजी सन १९९३ ते सन २००० अखेर पैकी कार्यालयाकडे उपलब्ध असलेली माहितीचे १ ते ५२ पृष्ठांची माहिती पुरविली असल्योन प्रथम अपिल निकाली काढले.

सुनावणीदरम्यान विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती संबंधीत माहितीचे शुल्क कळविले होते. त्यानुसार अपिलार्थी यांनी माहिती शुल्क भरल्यानंतर अपिलार्थीस माहिती पुरविण्यात आली आहे. तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी हे मयत झाले आहेत.

सुनावणीदरम्यानचा युक्तिवाद व आयोगास सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता असे दिसून आले की, अपिलार्थी यांच्या दिनांक १०/०९/२०२१ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती शुल्क कळविले असल्याचे दिसुन येते. तसेच अपिलार्थी यांनी माहिती शुल्क भरल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविली असल्याचे स्पष्ट होते. मात्र अपिलार्थी यांनी द्वितीय अपील दाखल करतांना जन माहती अधिकारी यांनी माहितीचे ८३ पृष्ठे असुन सदर माहितीचे शुल्क ३१६/- भरण्याबाबत कळविले असल्याचे दिसुन येते. तसेच माहिती पुरवितांना ५२ पृष्ठांची माहिती पुरविली आहे. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्याकडून जास्त माहिती शुल्क भरणा करुन घेतला असल्याचे कारण नमुद केले आहे. वास्तविक जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्याकडून जास्त आकारलेले माहिती शुल्क त्यांना परत करणे आवश्यक होते. मात्र जन माहिती अधिकारी यांनी तसे केल्याचे दिसुन येत नाही. तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी हे मयत झाले आहेत.

या प्रकरणी अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाली आहे. मात्र तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडून जास्तीचे माहिती शुल्काचा भरणा करुन घेतला असल्याने त्यांचे उर्वरीत माहिती शुल्क त्यांना परत मिळाले नाही. त्यामुळे आता जिल्हा परिषद कार्यालय, ग्रामीण पाणी पुरवठा उप विभाग, अमळनेर यांनी सदर जास्त भरलेले माहिती शुल्क परत करणे आवश्यक आहे.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१) जिल्हा परिषद कार्यालय, ग्रामीण पाणी पुरवठा उप विभाग, अमळनेर, ता. अमळनेर, जि. जळगांव यांनी हा आदेश मिळाल्यापासुन १५ दिवसांच्या आत अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक १०/०९/२०२१ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने कार्यालयात जास्त भरलेले माहिती शुल्क अपिलार्थीस परत करावे.

२) वरील आदेशांसह प्रस्तुत द्वितीय अपील क्रमांक ५०८/२०२२/जळगांव निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ नाशिक

**(समीर सहाय)**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

प्रति,

१) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परीषद कार्यालय, जळगांव, ता.जि. जळगांव.
यांनी आयोगाच्या आदेशाची प्रत संबंधित अधिकारी यांना हस्तांतरीत करुन पोच उलटटपाली आयोगाला सादर करावी. तसेच आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी सुनिश्चित करुन अहवाल ३० दिवसांचे आत सादर करावा.

**क्रमांक : रामाआ- नाशिक/द्वि.अ.क्र./५०८/२०२२/जळगांव ओ-** 228 **दिनांक-** 22/02/2023